Shri Manohar Keshav Randive Library-Tala

नवराष्ट्र
www.navarashtra.com

तटकरे महाविद्यालयात भूगोल दिन

भूगोल विभाग प्रमुख डॉ. राजाराम थोरात यांचे मार्गदर्शन

तळा, (वा.) तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे, द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील 'भूगोल विभाग' अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मंगळवार दिनांक १४ जानेवारी रोजी आभासी पद्धतीने राष्ट्रीय भूगोल दिन संपन्न झाला. यावेळी ४२ महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोनम पवार यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिवाकर कदम यांनी केले. भूगोल विभाग प्रमुख डॉ. राजाराम थोरात यांनी भूगोल दिनानिमित्त विद्यार्थ्यांना आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व्याख्यानातून भौगोलिक माहिती सांगितली. भारतात सर्वप्रथम भूगोल दिन साजरा करण्याची संकल्पना डॉ. सी.डी देशपांडे या भूगोल विचारवंतांनी १९९० साली मांडली. भारतात सर्वप्रथम १४ जानेवारी १९९० पासून राष्ट्रीय भूगोल दिन साजरा करायला सुरुवात झाली. कारण १४ जानेवारी हा दिवस ज्येष्ठ भूगोल तज्ञ डॉ. सी.डी देशपांडे यांचा जन्मदिवस आहे. त्यांचे भूगोलशास्त्रातील योगदान लक्षात घेता सर्वानुमती एकमत झाले. तेव्हापासून आजपर्यंत भूगोल दिन १४ जानेवारी म्हणजे मकरसंक्राती दिवशी साजरा करण्यात येतो.

पर्यावरणासाठी जनजागृती

या दिवशी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पृथ्वीतलावरील जैवविविधता, प्राकृतिक रचना, पर्यावरणीय समस्या, मानवनिर्मित समस्या, नैसर्गिक पर्यावरण, परिसंस्था याविषयी सखोल माहिती मिळावी. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजामध्ये पृथ्वीवरील नैसर्गिक पर्यावरण निकोप राखण्यासाठी जनजागृती व्हावी हा या मागचा प्रमुख हेतू आहे. आज अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण झालेल्या आहेत. हवा प्रदूषण, जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, मृदा प्रदूषण, आम्ल पर्जन्य, जागतिक तापमान वाढ, उष्णतेच्या लाटा, थंडीच्या लाटा, भूमिपात, आवर्त यामुळे पृथ्वीतलावरील सजीव सृष्टीचे अस्तित्व आज धोक्यात आले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पृथ्वीवरील नैसर्गिक पर्यावरणाचे संवर्धन करण्याची जबाबदारी आज तरुण पिढीवर आहे हे पटवून दिले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भगवान लोखंडे यांनी केले. यावेळी प्राध्यापक वर्ग आणि कार्यालयीन कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

Raigad Plus Edition
Jan 16, 2025 Page No. 3
Powered by: Navarashtra.com